PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Gharabaher
Year: 1999

Song: Punvechi Raat Sakhya
Lyricist: Vijay Kuvalekar

आ...
पुनवेची रात सख्या
पुनवेची रात सख्या चांदवा झुले
मोहरल्या कायेतून केवडा फुले
मोहरल्या कायेतून केवडा फुले
पुनवेची रात सख्या
चमचमे गं चांदणं बाई
साजणाला साद देई
चमचमे गं चांदणं बाई
साजणाला साद देई
नजरेच्या भेटीतून केवडा फुले
पुनवेची रात सख्या
मंद मंद वारा वाहे
लोचनात रूप पाहे
वारा वाहे रूप पाहे
हो...
पुनवेची रात सख्या
पुनवेची रात सखे

कुठे कुठे झिरमिरती थेंब दवाचे
दव भिजल्या ओठावर गीत कुणाचे
हो...
कुठे कुठे झिरमिरती थेंब दवाचे
दव भिजल्या ओठावर गीत कुणाचे
झाडातून थरथरती सावली घने
पुनवेची रात सख्या
पुनवेची रात सखे
आ...
आ... निजलेल्या कोटरात स्वप्न जागते
स्वप्नापरी गूढ रम्य विश्व भासते
आ... निजलेल्या कोटरात स्वप्न जागते
स्वप्नापरी गूढ रम्य विश्व भासते
हुरहुरती कायपिसी अंतरी उरे
पुनवेची रात सख्या
पुनवेची रात सखे

शोधू कसे रावे गेले
दूर दूर कुण्या देशी
भरत आलं पिक तरी
नाही कुठे राखण कशी
आ...
उधाणलेल्या आठवांचे
रंग गंध उरी भरू
धूसर वाटा नको फोफाटा
चला सयांनो फेर धरू
हो...
हात आले हातामध्ये गोफ गुंफले
पुनवेची रात सख्या
आ... आ...
आ... आ...
आ... आ...
आ... आ...

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*